भारत-आर्मेनिया परराष्ट्र कार्यालय सल्लामसलतीची 12वी फेरी (29 ऑक्टोबर 2026)

भारत-आर्मेनिया परराष्ट्र कार्यालय सल्लामसलतीची (एफओसी) 12वी फेरी नवी दिल्ली येथे 29 ऑक्टोबर 2026 रोजी पार पडली. भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व सचिव (पश्चिम), राजदूत सिबी जॉर्ज आणि आर्मेनियाच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व आर्मेनियाचे उप-परराष्ट्र मंत्री महामहिम श्री. म्नात्सकन सफार्यान यांनी केले. 07 नोव्हेंबर 2025 रोजी आर्मेनिया येथे एफओसीची मागील फेरी आयोजित करण्यात आली होती.

2.भारत आणि आर्मेनिया यांच्यात राजकीय आणि अधिकृत स्तरावरील नियमित देवाणघेवाणीद्वारे चिन्हांकित जिव्हाळ्याचे आणि मैत्रीपूर्ण संबंध आहेत. 2027 हे दोन्ही देशांमधील राजनैतिक संबंधांच्या स्थापनेच्या 35व्या वर्षपूर्तीचे प्रतीक असेल.

3.एफओसी दरम्यान, उभय बाजूंनी द्विपक्षीय संबंधांच्या संपूर्ण व्याप्तीचा आढावा घेतला. ज्यामध्ये उच्च-स्तरीय देवाणघेवाण, संस्थात्मक यंत्रणे अंतर्गत सहभाग आणि व्यापार आणि गुंतवणूक, विज्ञान आणि टेक्नॉलॉजी, एआय, शिक्षण, दहशतवाद विरोधी, संस्कृती आणि नागरिक परस्पर संबंध यांचा समावेश आहे.

4.बहुपक्षीय मंचांवरील सहकार्यासह परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवरही उभय बाजूंनी विचारांचे आदान-प्रदान केले.

5.परराष्ट्र कार्यालय सल्लामसलतीची पुढील फेरी आर्मेनियामध्ये परस्पर सोयीस्कर तारखेला आयोजित करण्यावर सहमती झाली.

नवी दिल्ली

29 ऑक्टोबर 2026